Downloaded From: http://iasexamportal.com





# MARATHI

**( Compulsory )**

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 300

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI (Devanagari Script) unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

**1.** खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* महिलांची राजकारणातील भूमिका

*(b)* चीनच्या आर्थिक विकासाची भारताला चिंता वाटते का?

*(c)* भारतीय समाजात घटस्फोटांची स्वीकारहिता वाढली आहे

*(d)* कडक कायदे नैतिकता निर्माण करू शकतात?

**2.** पुढील उतारा काळजीपूर्वक वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 12×5=60

जागतिक स्तरावर माणसांचे स्थलांतर कित्येक शतकांपासून सुरू आहे. माणसं समूहाने एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशाकडे वेगवेगळ्या कारणांमुळे जाऊ लागली. गायरान जमीन किंवा लागवडीसाठी योग्य असणाऱ्या जमिनींच्या शोधासाठी. जुलमी राजवटींपासून किंवा छळांपासून मुक्त होण्यासाठी. विचार आणि अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी. किंवा वारंवार भटकण्याच्या तीव्र इच्छेपोटी. परक्या प्रदेशातून आलेल्या माणसांनी आपल्या सामानाप्रमाणे त्यांची संस्कृतीही आणली आणि त्यावर ताबा ठेऊन ती प्रवासात जतन करण्याचा किंवा त्याबाबत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. ते इतर जमातीत मिसळून गेले. त्या दिशेने त्यांनी युद्ध किंवा व्यापार किंवा विवाहविधी किंवा सर्वसामान्य उपक्रमांमधून संघर्ष केला. सुरूवातीला संघर्षामुळे काही काळ तणावांत गेला, नंतर यथावकाश त्यांनी वर्चस्व प्रस्थापित केले. आणि कला व विशेष कौशल्याच्या माध्यमातून शांतपणे भरभराट केली. आदान-प्रदानातून नातेसंबंध निर्माण झाले. मोकळ्या वातावरणात कोणत्याही सांस्कृतिक-सामाजिक वर्चस्वाशिवाय प्रत्येक समूह बहुजिनसी समाजात विकसित होत गेला. म्हणून मंगोलीयन लोक अलास्कापर्यंत गेले. ॲंग्लो-सॅक्सोन्स ब्रिटन मध्ये गेले. म्हणून कदाचित मोझेस मार्फत लोकांनी पवित्र भूमी निवडली किंवा नवी भूमी शोधण्याचे वचन दिले. कोलंबसने युरोपातील नव्या राष्ट्राचे जागतिक स्वरूपाचे धाडसी नेतृत्त्व केले. नंतर वसाहतीकरण झाले. अन्य देशांना आणि संस्कृतींना जिंकणारे विजेते ठरले. आणि त्यांनी सगळ्यांना आपल्या अधिपत्याखाली आणले. उद्योग आणि व्यवसाय या आजच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टामुळे लोक मोठया संख्येने एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होत आहेत. संमिश्र संस्कृतिचे हे उदाहरण म्हणता येईल. प्रत्येक समूह वडिलोपार्जित गोष्टी आंतरिक प्रेरणेतून टिकवून ठेवत असतो. जुन्या घराविषयी कधी काळी वाटणारी ओढ एका किंवा दुसऱ्या पिढीनंतर कमी होत जाते. नंतरच्या शतकात कदाचित एखादा वेगळे असे धाडस करण्याचे सामर्थ्य दाखवू शकतो. जगभरातील लोकांना आपल्या जुन्या प्रादेशिक जिव्हाळ्यासंबंधी शोध घेणं अवघड होऊन बसतं. तुम्ही जिथं ज्यावेळी राहता तो भूभाग तुमचा होऊन जातो. तुम्ही नव्या प्रदेशातील रंग-गंधामध्ये मिसळून जाता. स्थानिक गोष्टी व्यापक अवकाशात सामावून जातात. काही थोडेच लोक असे असतात की ते आपली जुनी ओळख टिकवून ठेवतात. तोवर संयोगवश एखादी पिढी आपल्या संवेदनशीलतेतून मुक्त होऊन, हरवलेल्या स्वत्वाची काळजी घेण्याच्या पलीकडे पाहू शकते. कोणतीही स्त्री अथवा पुरुष अथवा संस्कृती जास्त काळ एकटे राहू शकत नाही. केंद्रवर्ती आणि अपकेंद्री झोत काही काळ कार्यरत राहतो. स्वतंत्र नागरिकत्वाच्या येऊ घातलेल्या अस्तित्वासाठी असंख्य पिढ्या प्रार्थना करतात. बाहेरच्या सगळ्या परिणामांना उघड विरोध करून आपली मोहर उमटवतात. तथापि आपल्याला हे चांगल्या प्रकारे ठाऊक आहे की आपण आत्यंतिक संवेदनशील आहोत. स्वेच्छेने प्रतिसार आणि प्रतिक्रिया देण्यामुळे आम्ही कधी स्वतंत्र असतो तर कधी आश्रित असतो. जीन्स, डी० एन० ए० आणि आर० एन० ए० आधीच जोडले गेलेले असतात. यापूर्वी काय घडुन गेलंय हे प्रत्येक मज्जातंतूला स्मरत असतं. दुसरे लोक काय विचार करतात, काय म्हणतात आणि काय करतात हे शरीर, मन आणि स्वतःचं अध्यात्म ग्रहण करीत असतं. अज्ञानामुळे भय जन्माला येतं. भय द्वेष निर्माण करतं. द्वेष आत्मविश्वासाला नष्ट करतो. आणि हे सगळं आम्हाला मृत्यूकडे घेऊन जातं. अनेक प्राचीन संस्कृती या प्रकारे मिसळून दीर्घकालीन भूतकाळात लयास गेल्या. एखाद्याला तग धरून राहण्यासाठी दुसऱ्यामध्ये सामावून जावे लागते. नाहीतर दुसरेही नामशेष होतात.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

प्रश्न :

(a) स्थलांतरीत लोक नव्या व्यवस्थेत तेथील लोकांशी कशा प्रकारे व्यवहार करतात?

(b) अलिकडच्या काळात लोक कोणत्या कारणांमुळे स्थलांतर करतात? आधीच्या कारणांपेक्षा ही कारणे कशी वेगळी आहेत?

(c) संस्कृती एकमेकांमध्ये कशा प्रकारे मिसळते?

(d) अनेक प्राचीन संस्कृती कशा प्रकारे लयाला गेल्या?

(e) संस्कृती ही अलिप्त राहु शकत नाही, असे लेखक का म्हणतो?

**3.** खालील उताऱ्याचा एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा, उताऱ्याला शीर्षक देऊ नये : 60

जेव्हा आपण एखाद्या नोकरीसाठी अर्ज करतो आणि अर्जात स्वतःची माहिती लिहितो तेव्हा साधारणतः आपण आपला अनुभव आणि इतर चांगल्या गोष्टींची माहिती देतो. अनेक लोक आपण आपल्या करियरमध्ये कशा आव्हानांना सामोरे गेलो आणि त्यात कसे यश मिळवले हे निदर्शनास आणून देतात. जेव्हा व्यवस्थापनाकडे ही माहिती येते तेव्हा त्यांना नेहमी वाटतं की, प्रत्येकानं आपल्या चांगल्या गोष्टींची माहिती नोंदवलेली आहे आणि आपण शक्य त्यांना संधी देण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. सामाजिक व्यवहारात ही नमुनेदार गोष्ट म्हटली पाहिजे.

या संदर्भात क्रीडा क्षेत्राशी संबंधित अशी एक सत्य कथा आहे. विद्यापीठाचा फूटबॉल संघ मैदानावर धावण्याचा सराव करीत असतो. त्या संघातील एका खेळाडुवर लाईनमनची जबाबदारी सोपवलेली असते. हा खेळाडू संघातील उत्कृष्ट लाईनमन म्हणून ओळखला जायचा. एके दिवशी तो आपल्या प्रशिक्षकाकडे गेला आणि इतरांसोबत थोडेच अंतर भरधाव वेगाने धावण्याचा सराव करण्याची त्याने परवानगी मागितली. प्रशिक्षकाने ती दिली.

लाईनमन दररोज धावण्याच्या सरावासाठी जाऊ लागला. पण रोजच तो मागे पडू लागला. दरदिवशी त्याने वेगाने धावणाऱ्यां-सोबत सराव सुरू ठेवला पण तो मागेच पडत होता. यात विशेष नव्हतं कारण लाईनमनने वेगानंच धावलं पाहिजे हे अपेक्षित नव्हतं. प्रशिक्षकाच्या हे लक्षात आलं. आणि त्यानं विचार केला की, हे चमत्कारिक आहे. या फूटबॉल संघातल्या खेळाडूला धावपटूंसोबत खेळण्याची काय गरज आहे? आणि त्यातही तो मागेच पडतोय्. त्यानं इतर लाईनमनसोबत वेगानं धावण्याचा सराव करायला हवा.

प्रशिक्षक त्या तरूण खेळाडूवर नजर ठेऊन होता. आणि नेहमीच मागे पडत असल्यामुळे शेवटी त्यानं त्या खेळाडूला विचारलं, "तुला यश मिळवायचं असले तर इतर लाईनमनशी स्पर्धा करायला हवी. या खेळांडूमध्ये तू नेहमीच मागे पडतोय्." परंतु फूटबॉल खेळाडूच्या उत्तरानं प्रशिक्षकाला आश्चर्य वाटले. तो तरूण खेळाडू म्हणाला, मी लाईनमन म्हणून धावत नाहीय्. मला हे ठाऊक आहे की मी ते काम करू शकतो. मी वेगात कसे धावायचे हे शिकण्यासाठी धावपटूंसोबत स्पर्धा करतोय्. आणि तुम्ही जर नीट पाहिलं असेल तर तुमच्या लक्षात आलं असेल की मी दरदिवशी कमी अंतराने मागे पडतोय्.

ही गोष्ट आपल्या अध्यात्मिक विकासाची गोपनीयता स्पष्ट करणारी आहे. जगात कुठेही काम करताना आपण नेहमी उत्तमतेचा ध्यास घ्यायला हवा. जेव्हा ही गोष्ट अध्यात्मात येईल तेव्हा आपला विकास हा परमेश्वराजवळच्या खुल्या पुस्तकासारखा असेल. आपल्याला मिळणारा आनंद हा अध्यात्मिक उन्नतीमधूनच मिळेल. आणि तो प्रामाणिक प्रयत्नांमधूनच मिळवता येईल.

फूटबॉल खेळाडूला जाणवलं कीं त्यानं आपल्या कीर्तीप्रमाणे मोठी मजल मारलेली नाही. त्याला ठाऊक आहे की स्वतःशीच स्पर्धा करून आपण पुढं जाऊ शकतो. धावपटू म्हणून आपण कमी पडतो हे लक्षात आल्यामुळेच तो अधिक चांगली कामगिरी करण्याचा निश्चय करतो. आपल्या संघात जे उत्तम खेळाडू आहेत त्यांच्याशी स्पर्धा करून त्याला अधिक गुणवत्ता प्राप्त करायची होती. स्वतःमधील उणेपणाची त्याला जाणीव झाल्यामुळे त्याने त्यावर मात करण्याचा निश्चय केला आणि गुणवत्ता संपादन केल्यावर त्याने प्रशंसेची अपेक्षा बाळगली नाही.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

इतर धावपटू कसे खेळतात आणि स्वतःची क्षमता कशी विकसित करतात हे फूटबॉल खेळाडूने पाहिले. मागे पडण्यामुळे पुढील वेळी आपण नक्की काय केले पाहिजे हे त्याला जाणवले. असं करण्यामुळेच तो दरदिवशीच्या मागे पडण्याच्या अंतरात कपात करीत गेला. आपण आपल्या उणेपणाकडे लक्षपूर्वक पाहिलं तर चांगलं करण्यासाठी आपण दरदिवशी काय करायला हवं हे आपल्या लक्षात येईल. प्रयत्नांती असे दिसेलकी आधीपेक्षा आपण बरेच पुढे गेलो आहोत. काही काळानंतर आपण अपेक्षित ठिकाणी पोचून गुणवत्ता संपादन करून उणेपणावर मात केली असे दिसेल.

आपल्या अपयशाबद्दल सगळ्यांकडे लक्ष असणाऱ्या परमेश्वराला दोष देऊ नये. आपल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळेच आपण उणेपणावर मात करतो. परमेश्वरालाही तेच अपेक्षित आहे. आपले प्रयत्न हे परमेश्वराच्या निदर्शनास येतात. आणि आपला प्रामाणिकपणाही त्याला भावतो. आपण संघर्ष करीत असू तर आपल्याला मदत मिळते. आपल्या उणेपणावर मात करून यश मिळवण्यासाठी परमेश्वर आपल्याला प्रेरणा देतो.

**4.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

Most people involved in the film production industry know that there is a constant evolution. The change is in the way movies are made, discovered, marketed, distributed, shown, and seen. Following independence in 1947, the 1950s and 60s are regarded as the 'Golden Age' of Indian cinema in terms of films, stars, music and lyrics. The genre was loosely defined, the most popular being 'socials', films which addressed the social problems of citizens in the newly developing state. In the mid-1960s, camera technology revolutionized the documentary method by enabling the synchronized recording of image and sound. Today, CINEMA 4D users are free to create scenes without worrying about the size of objects or how many objects are in the scene, shaded settings, texture size, multipass-rendering or eye-catching particle systems.

Until the 1960s, filmmaking companies, many of whom owned studios, dominated the film industry. Artistes and technicians were either their employees or were contracted on a long-term basis. Since the 1960s, however, most performers went the freelance way, resulting in the star system and huge escalations in film production costs. Financing deals in the industry also started becoming murkier and murkier, since then. According to estimates, the Indian film industry has an annual turnover of ₹ 60 billion. It employs more than 6 million people, most of whom are contract workers as opposed to regular employees. In the late 1990s, it was recognized as an industry.

More money impacted the perception, visual representation, and definitions of reality. Like any other media of mass communication, the themes are relevant to their times.

Thus, filmmaking became more expensive and riskier. As opposed to the time of the Gemini Studios, when only 5 percent of a movie was shot outdoor, filmmakers often select overseas locations in order to create greater realism, manage costs more efficiently or source people and props. Filmmakers spend considerable time scouting for the perfect location.



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

5. विनोद बुद्धी ही लोकांची क्षमता किंवा गुणविशेष आहे. भावनांना ती आवाहन करून मनोरंजन करते किंवा लोकांना हसवते आणि त्यांना आनंदी करते. 20

परीक्षणाचे कार्य निवाड्याची किंवा स्पष्टीकरणाची माहिती देते विधायक टीका ही संदेशवहनाचा प्रकार आहे. एखादी व्यक्ती अन्य दुसऱ्या व्यक्तीचे वर्तन संसदीय मार्गाने सुधारू पाहते. एखादी व्यक्ती सामाजिकदृष्ट्या चुकीचे वागत असेल तर अशा प्रकारची टीका ती कौशल्याने निदर्शनास आणून देते. हुकुमशाही प्रवृत्तीला विरोध करण्याचा हा विधायक आणि शांततामय पद्धतीचा परोपकारी मार्ग आहे.

समीक्षक उपहासाचा एक साधन म्हणून वापर करतात. तो सामान्यतः थट्टेखोर आणि गमतीशीर असतो. तथापि उपहासाचा हेतू विनोद निर्माण करण्याचा नसतो पण तरीही उपहासात्मक टीका व्यक्तिवर किंवा समूहावर चांगल्या पद्धतीने करता येते.

उपहास हा एक नेमकेपणाने वापरला जाणारा वाङ्मयीन शब्द आहे. तो अचूकपणे व्यक्तीचा किंवा समूहाचा वेध घेतो. एखादी कल्पना किंवा प्रवृत्ती, एखादी संस्था किंवा सामाजिक वर्तन, अशा कोणत्याही संदर्भात उपहास वेध घेतो.

उपहास नेहमीच विनोद आणि क्षुब्ध भावना मिश्रीत असतो. तो गांभीर्यपूर्वक विचलीत करतो, तथापि तो अपरिहार्यपणे आणि कठोरपणे उपरोधिक विधान करतो परंतु नेहमीच त्याचा चुकीचा अर्थ लावला जातो. हा एक कलात्मक आहे जो मानवी वा व्यक्तिगत दुर्गुण, मूर्खपणा, गैरवर्तन आणि उणेपणा अधोरेखित करतो पण त्याचा चेष्टा, टर, विडंबन, टिंगल हाच अर्थ घेतला जातो. काहीवेळा विशिष्ट हेतू ठेऊनही तो उपयुक्तता समोर आणतो. साहित्य आणि नाटक हे याचे मुख्य माध्यम आहेत. पण हा चित्रपट, दृश्यकला आणि राजकीय व्यंगचित्रे अशा माध्यमांमध्येही आढळतो. विडंबनकार हा समाजातील एक सभ्य माणूस असतो जो प्रत्येक ठिकाणी विसंगती पाहतो पण तो उग्र स्वरूपाऐवजी सौम्य पद्धतीने ती नजरेस आणतो.

6. *(a)* खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 2×5=10

*(i)* उंटावरचा शहाणा

*(ii)* खाई त्याला खवखवे

*(iii)* चोराच्या उलट्या बोंबा

*(iv)* हा सूर्य हा जयद्रथ

*(v)* शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा विस्तार *10* वाक्यात करा : 5×2=10

*(i)* मरणात खरोखर जग जगते

*(ii)* जया अंगी मोठेपण तया यातना कठीण

*(c)* पुढील विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

समाज आणि प्रसार माध्यमे



Downloaded From: http://iasexamportal.com

Downloaded From: http://iasexamportal.com

(d) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1×10=10

(i) उंच

(ii) चांगला

(iii) सुख

(iv) खोल

(v) धाकटा

(vi) हुशार

(vii) महाग

(viii) चपळ


(ix) उष्ण

(x) गोड

★★★



Downloaded From: http://iasexamportal.com




## What you will get:


- 100% G.S. Syllabus Covered
- 8+ Booklets
- More Than 2500+ Pages
- Guidance & Support from Our Experts

## Our Objectives:

- Firstly to cover 100% civil service Mains examination (IAS) syllabus.
- Secondly to compile all the required study materials in a single place, So to save the precious time of the aspirants.

For More Information Click below Link

http://iasexamportal.com/civilservices/study-kit/gs-mains




---

# Online Coaching for IAS Mains General Studies I, II, III & IV (Combo)

---

## What you will Get (?)

- **General Studies (Paper – I, II, III & IV) Online 100 % Reading Material of the Syllabus (Which can be saved easily)**
- **Slides (For Giving Summary of Each Topics)**
- **Categorized Unit and Sub-Unit Wise Question Papers of General Studies**
- **Current General Studies Magazine (Indispensable Magazine for General Studies)**
- **Daily Answer Writing Challenge for IAS Mains Contemporary Issues**
- **It is full of tips on areas of emphasis, caution while reading and writing , how to write the answer (?) .**
- **Model Test Question Paper for General Studies - I, II, III and IV for Mains Exam 2015**
- **Online and Telephonic interaction with the course director, and continuous evaluation through a regular online writing session in every chapter and topic.**

## For More Information Click below Link

http://iasexamportal.com/civilservices/courses/ias-mains-gs-combo




# G.S. FOUNDATION COURSE (PRELIMINARY+ MAINS)

---

**Dear Aspirants,**
The Indian Civil Services examination is conducted by the Union Public Service Commission (UPSC) every year.

The competitive examination comprises of three stages :

- Preliminary Examination – (Objective Test)
- Main Examination (Written )
- Interview Test

The examination schedule is announced during January - February.

The Preliminary held in May-June and the results are announced in July-August.

The Main examination held in October-November and the candidates those who qualify at this stage are invited to the interview in March-April next year.

## We will provide you:

- BOOKS
- STUDY KITS
- MAGAZINES
- Mock Test Papers
- Monthly Magazine- Civil Services Mentor
- Gist of Important Newspapers
- Free Access to Online Coaching at IASEXAMPORTAL
- Previous Year paper’s with solution
- Previous Year question’s trend analysis
- Free Login Access worth Rs 1999 for IAS PRE 2015
- Free Gist Subscription worth Rs 449
- Free Weekly Subscription worth rs 399
- TELEPHONIC/EMAIL GUIDANCE WITH COURSE CO-ORDINATOR

**For More Information Click Given below link:**

http://iasexamportal.com/civilservices/study-kit/ias-pre/general-studies-foundation-course